मराठी माणसाचा मानदंड

follow us : /rajdandlive

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक ३०६ सातारा शुक्रवार दि २ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/


## लोहगडच्या पायथ्याशी असलेल्या डोंगराला भेगा

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यातील किल्ले लोहगडच्या पायथ्याशी असलेल्या डोंगराला भेगा पडल्यामुळे भूस्खलन होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत. लोहगड गावात डोंगराला भेगा असल्याने प्रशासनाकडून सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरड कोसळण्याच्या भीतीने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भेगा दिसताच गुराख्यांनी ग्रामस्थांना सतर्क केले. यावेळी तलाठी यांनीही पाहणी केली आहे.

किल्ले लोहगड गडाच्या पायथ्याशी असलेल्या लोहगड व धालेवाडी गावाला मोठा धोका निर्माण झाला आहे. लोहगड गावामध्ये सुमारे ५०० ते ६०० लोकवस्ती असलेले गाव असून, तर धालेवाडी २५० ते ३०० लोकवस्ती असलेले गाव आहे. याठिकाणी सन १९८९ साली मोठ्या प्रमाणावर भुस्खलन होऊन लोहगड येथील तीन ते चार घरे यामध्ये गाडली गेली होती. तर अनेक जनावरे मृत पावले होते.



## तब्बल ७२ वर्षांनी महाराष्ट्रात वैयक्तिक पदक

**स्वप्नील कुसाळेने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत ५० मीटर रायफल स्पर्धेत थ्री पोझिशनमध्ये ब्राँझ मेडल पटकावलं. हे पदक महाराष्ट्रासाठी खास आहे. कारण १९५२ साली खाशाबा जाधवांनी हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये, कुस्तीत ऐतिहासिक ब्राँझ मेडल जिंकलं होतं. त्यानंतर महाराष्ट्रासाठी अशी भरारी घेतलीय ती कोल्हापूरच्या स्वप्नील कुसाळेने अन् तीही तब्बल ७२ वर्षांनी. स्वप्नीलचा आदर्श आहे टीम इंडियाचा वर्ल्ड चॅम्पियन कॅप्टन कूल महेंद्रसिंग धोनी. ज्याप्रमाणे धोनी त्याच्या आयुष्यात तिकीट कलेक्टर होता. त्याचप्रमाणे स्वप्नील देखील मध्य रेल्वेमध्ये तिकीट कलेक्टर म्हणून काम करतो. धोनीच्या मैदानातील शांत आणि संयमी स्वभावाचा प्रभाव, त्याच्या नेमबाजीतही आज पाहायला मिळाला. ज्यामुळे त्याला यशोशिखर गाठता आलं आणि स्वप्नीलची स्वप्नवत कामगिरी जागतिक पातळीवर गौरवली गेली.**

# महाराष्ट्राच्या सुपुत्राचा राज्य सरकारकडून सन्मान

**मुंबई :** पॅरिस ऑलिम्पिकमध्य `महाराष्ट्राच्या सुपुत्राने मोठे यश मिळवले. मूळचा कोल्हापूरच्या राधानगरीचाअसलेल्या स्वप्नील कुसाळेने बुधवारी ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. या स्पर्धेसाठी अनेक मातब्बर खेळाडू मैदानात होते. त्यातून स्वप्नीलने तिसरा क्रमांक पटकावला आणि भारताला आणखी एक पदक मिळवून दिले. भारताला तिसरेपदक मिळवून देणाऱ्या महाराष्ट्राच्या स्वप्नील कुसाळेशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेआणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्हिडीओ कॉन्स्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. त्यावेळी बोलताना एकनाथ शिंदेयांनी स्वप्निलला राज्य सरकारकडून१ कोटीचेबक्षिस जाहीर केले.

मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री दोघांनीही स्वप्नीलच्या प्रशिक्षकांशी संवाद साधला आणि त्यांचेही अभिनंदन केले.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले ?**

एकनाथ शिंदे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये याबाबत माहिती दिली. ते म्हणाले की,पॅरिस ऑलिम्पिक २०२४स्पर्धेतील आपल्या उत्तुंग यशामुळे स्वप्नीलने महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली..!पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये नेमबाजीत कांस्य पदकाचा वेध घेणाऱ्या स्वप्नील कुसाळेच्या कुटुंबियांशी आज मंत्रालयातील दालनातून दूरध्वनीद्वारे संपर्क साधून कुसाळे कुटूंबियांचे अभिनंदन केले. स्वप्नीलने आपल्या लक्ष्याचा अचूक वेध घेऊन कांस्य पदक पटकावले आहे. स्वप्नीलच्या नेमबाजीतील पुढील वाटचालीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे यावेळी स्वप्नीलचे वडील सुरेश कुसाळे यांना सांगितले. कुसाळे कुटुंबियांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच स्वप्नील या यशापर्यंत पोहचू शकला आहे. त्याच्या गेल्या १२ वर्षांच्या मेहनतीमुळे देशाला आणि राज्याला क्रीडा क्षेत्रातील महत्वपूर्ण असे यश मिळाले आहे. या यशासाठी कुसाळे कुटुंबियांसह, स्वप्नीलला शालेय जीवनापासून ते नेमबाजीत करिअर करण्यासाठी प्रोत्साहन देणारे सर्व गुरुजन, प्रशिक्षक, मार्गदर्शक अशा सर्वांचे योगदान निश्चितच महत्वाचे असल्याचे सांगून या सर्वांचे अभिनंदन केले.अजित पवार म्हणाले...पुरुष ५० मीटर रायफल थ्री पोझिशन गटात नेमबाजीमध्ये कांस्यपदक मिळवणाऱ्या स्वप्निलच्या जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाला सलाम, असं अजित पवार म्हणाले आहेत. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धा २०२४ मध्ये कांस्य पदक मिळवून महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचं नाव उंचावल्याबद्दल स्वप्निल कुसळे याचं मन:पूर्वक अभिनंदन, असेही अजित पवार म्हणाले.

**असा रंगला सामना**

फायनलमध्ये सुरुवातीला स्वप्नील सहाव्या स्थानी होता. अंतिम फेरीत एकूण आठ स्पर्धक होते. प्रत्येक नेमबाजाला ४० शॉट्सची संधी होती.

हे शॉट्स पूर्ण झाल्यानंतर सर्वात कमी गुण असलेले दोन खेळाडू स्पर्धेबाहेर झाले. नंतर प्रत्येक एका शॉटनंतर सुवर्ण आणि रौप्यपदक निश्चित होईपर्यंत प्रत्येक १-१ खेळाडू बाहेर होत गेला. अखेर भारताच्या स्वप्नीलने कांस्यपदकाची कमाई केली.

## रेल्वेकडून अधिकारी पदावर बढती

**तब्बल ७२ वर्षानंतर एका मराठी मुलाला ऑलिंपिकमध्ये पदक मिळालेले आहे. स्वप्नील सध्या मध्य रेल्वेच्या पुणे डिव्हिजन मध्ये टीसी म्हणून काम करतोय. यामुळेच मध्य रेल्वेसाठी ही गर्वाची गोष्ट आहे. ज्यावेळेस स्वप्नील हा पॅरिस हून भारतात येईल त्यावेळेस भारतीय रेल्वेकडून त्याचा यथोचित सन्मान केला जाईल आणि ताबडतोब त्याला ऑफिसर म्हणून प्रमोशन देण्यात येणार आहे अशी घोषणा मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी केली. त्याचप्रमाणे रेल्वेमंत्री स्वप्नीलसाठी रोख बक्षीस देखील जाहीर करणार आहेत, त्यामुळे आता स्वप्नील हा मध्य रेल्वेचा एक ऑफिसर म्हणून यापुढे काम करेल, असे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी जाहीर केले आहे.**

# पीकविम्यासाठी १.६५ कोटी अर्ज

## राज्यातील १.१० कोटी हेक्टरवरील पिके संरक्षित




**पुणे :** खरीप हंगाम २०२४ मध्ये पंतप्रधान पीकविमा योजना अंतर्गत ३१ जुलैअखेर राज्यभरातून १ कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ अर्ज दाखल झाले आहेत. शेतकऱ्यांनी केवळ एक रुपया भरून आपले पीकविमा संरक्षित केले आहे.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान पीकविमा योजनेंतर्गत पीकविमा पोर्टलवर अर्ज दाखल करण्यास सुरुवातीला १५ जुलै ही अंतिम मुदत होती. मात्र, राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसह विविध कागदपत्रांसाठी सामूहिक सेवा केंद्रांवर गर्दी होती. शिवाय काही तांत्रिक अडचणीही येत होत्या. त्यामुळे बरेच शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिल्याने कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना विनंती करून ३१ जुलैपर्यंत मुदत वाढवून घेतली होती.

या १५ दिवसांच्या वाढीव मुदतीत २१ लाख ९० हजार अर्ज दाखल झाले आहेत. राज्यातील खरीप पेरण्या जुलैअखेर ९७ टक्क्यांवर गेल्या आहेत. खरीप क्षेत्र सुमारे १४० लाख हेक्टर आहे, त्यापैकी पीकविमा योजनेच्या माध्यमातून एकूण १ कोटी १० लाख ५५ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले आहे. तर एकूण विमा संरक्षित रक्कम ही ५३ हजार ८८६ कोटी इतकी आहे. एकूण विमा हफ्ता सुमारे ७९५९ कोटी इतका निश्चित असून, त्यापैकी शेतकरी हिस्सा एक रुपया प्रमाणे १ कोटी ६५ लाख, राज्य हिस्सा एकूण ४७२५ कोटी, त्यामध्ये राज्य शासनाचा स्वतःचा हिस्सा ३२३२ कोटी व शेतकऱ्यांच्या वतीने राज्य शासनाने भरावयाचा हिस्सा १४९२ कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे. केंद्र सरकारचा हिस्सा ३२३३ कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी ७२८० कोटींचा विमा

मागील वर्षीच्या खरीप हंगामामध्ये सुमारे १ कोटी ७१ लाख विमा अर्ज दाखल झाले होते. हंगामात वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीकविमा पोटी आतापर्यंत ७२८० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ४२७१ कोटी पीकविम्याचे वाटप पूर्ण झाले आहे. आणखी ३००९ कोटी रुपयांचे वितरण सध्या सुरू आहे. अंतिम पीक कापणी अहवालाचे काम शंभर टक्के पूर्ण झाल्यानंतर या रकमेत आणखी वाढ होणार असल्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

**पीकविमा दृष्टिक्षेपात**

एकूण अर्ज - १,६५,७०,४३७

एकूण विमा संरक्षित क्षेत्र - १, १०,५५, ३२८ हेक्टर

एकूण विमा संरक्षित रक्कम -५३,८८६ कोटी

एकूण विमा हफ्ता - ७९५९ कोटी

शेतकरी हिस्सा - १.६५ कोटी

राज्य हिस्सा एकूण ४७२५ कोटी

केंद्र सरकारचा हिस्सा ३२३३ कोटी.

मागील वर्षी १.७० कोटी शेतकऱ्यांनी पीकविमा अर्ज केले होते. यंदा १.६५ कोटी शेतकऱ्यांनी अर्ज केले. मागील वर्षी बनावट अर्ज केलेल्या २,८९,६०७ अर्ज रद्द केले होते. त्यामुळे सरकारच्या २९७.८३ कोटी रुपयांची बचत झाली होती. बनावट अर्जदार शेतकरी, बनावट अर्ज भरणारे सामूहिक सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे यंदा बनावट अर्ज भरणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे. - विनय कुमार आवटे, कृषी संचालक, विस्तार आणि प्रशिक्षण.

## राज्यात कोरोनाचा पुन्हा शिरकाव

# सातारा जिल्ह्यात आढळला एक संशयित रुग्ण



**सातारा :** सातारा जिल्ह्यात तब्बल दोन वर्षानंतर कोरोनाचा एक संशयित रुग्ण परजिल्ह्यांतून दाखल झाला असून, त्या रुग्णावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सातारा जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांपूर्वी कोरोनाने अनेक लोकांचा जीव घेतला. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. ही कोरोनाची लाट ओसरून जवळपास दोन वर्ष उलटून गेली परंतु आता राज्यात काही ठिकाणी कोरोनाचे रुग्ण आढळून येत आहेत.

चिपळूणमधील एक ५५ वर्षीय व्यक्ती कोरोनाबाधित आढळून आल्यानंतर त्या व्यक्तीला कऱ्हाडमधील कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु त्या व्यक्तीची प्रकृती चिंताजनक बनल्याने त्या व्यक्तीला रुग्णालय प्रशासनाने पुढील उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. गेल्या दोन दिवसांपासून त्या रुग्णावर उपचार झाल्याने त्या रुग्णाच्या प्रकृतीत चांगल्या प्रकारे सुधारणा झाली आहे. दोन दिवसांत त्या रुग्णाला घरी सोडण्यात येणार असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे यांनी सांगितले.

# जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर संभाजीराजेंच्या स्वराज्य संघटनेचा हल्ला

**मुंबई :** माजी खासदार संभाजीराजे छत्रपतींवरील वक्तव्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला झालाय. आमदार जितेंद्र आव्हाड ठाण्याकडे जात असताना काही जणांनी त्यांची गाडी अडवत त्यांच्यावर हल्ला केलाय. सीएसटीएम कडून इस्ट्न फ्री वे वर जाताना त्यांच्या कारवर हल्ला झालाय. स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हा हल्ल्या केला असल्याची प्राथमिक माहिती आहे. संभाजीराजे छत्रपती यांचं रक्त तपासलं पाहिजे, असं वक्तव्य जितेंद्र आव्हाड यांनी केलं होतं. त्यामुळे त्यांच्यावर हल्ला करण्यात आलाय.



जितेंद्र आव्हाड त्यांच्या गाडीतून प्रवास करत असताना ३ ते ४ हल्लेखोर आले त्यांनी गाडी फोडण्याचा प्रयत्न केला. ठाण्याच्या दिशेने आव्हाड त्यांच्या घरी निघाले होते. जितेंद्र आव्हाड यांनी संभाजीराजे छत्रपती यांचा अवमान केला, अशी भूमिका स्वराज्य संघटनेने मांडली आहे. आव्हाडांनी माफी मागावी, अशी मागणी देखील स्वराज्य संघटनेने केली होती.

मी घराकडे जात असताना गाडीवर दगड पडल्याचा आवाज आला. गाडी थांबवायला सांगितली, त्यानंतर हा हल्ला झालाय. संभाजी राजेंची चूक होती. विशाळगडावर जे काही झालं, ते त्यांच्या आडून झालं. त्यांची भूमिका योग्य नव्हती. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांच्या विसंगत त्यांची भूमिका होती. हे मी आज देखील सांगत आहे. राजर्षी शाहू महाराजांचं रक्त सर्वांना बरोबर घेऊन जाणारांचं रक्त होतं. त्यांचं भांडण लावणारं रक्त नव्हतं. शाहू महाराजांचा विचार एक टक्का देखील संभाजीराजेंमध्ये नाही, अशी प्रतिक्रिया आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली आहे.

# सुजय विखेंनी विधानसभेसाठी शड्डू ठोकला

**अहमदनगर :** लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत निलेश लंके यांनी पराभव केल्यानंतर माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी आता विधानसभा निवडणुकीकडे आपला मोर्चा वळवला आहे. संगमनेर किंवा राहुरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्याची त्यांची तयारी असून पक्षाकडे याबाबत इच्छा व्यक्त केल्याची माहिती सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.



लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्यात विधानसभा निवडणुकीची वेध लागले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीकडून विधानसभेची जोरदार तयारी करण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीत अहमदनगरच्या जनतेने सुजय विखेंना डावलून निलेश लंके यांना पसंती दिली. यानंतर आता सुजय विखेंनी विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवल्याने अहमदनगरमध्ये महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा आहे.

**थोरात विरूद्ध विखे लढत ?**

सुजय विखे यांनी संगमनेर किंवा राहुरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्याची तयारी केली आहे. याबाबत त्यांनी पक्षाकडे इच्छा देखील व्यक्त केली आहे. जनता व पक्षाचा निर्णय झाल्यास निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे त्यांनी म्हटलंय. सुजय विखे पाटील हे संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे राहिले तर त्याचा थेट सामना बाळासाहेब थोरात यांच्या रंगू शकतो. संगमनेर विधानसभेत बाळासाहेब थोरात हे सध्या विद्यमान आमदार आहेत. तर सुजय विखे यांनी राहुरी विधानसभा लढवल्यास प्राजक्त तनपूरे विरूद्ध सुजय विखे अशी लढत होणार आहे. आता सुजय विखे यांना नेमकी कुठल्या मतदारसंघातून उमेदवारी मिळणार? थोरात विखे सामना रंगणार का? अशा चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले आहे.

**काय म्हणाले सुजय विखे पाटील ?**

शिर्डी विधानसभा ही राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालीच लढली जाईल, अशी माझी अपेक्षा आहे. कारण पक्षाचा निर्णय होणे अद्याप बाकी आहे. तिकीट कोणाला मिळणार हा प्रक्रियेचा भाग आहे. पक्ष निर्णय घेईल, पक्ष त्यांना संधी देईल. आमच्या दृष्टिकोनातून आमच्या परिवारात साहेबच सर्वप्रथम असणार आहेत. राहिला मुद्दा माझा, आता मला बऱ्यापैकी वेळ आहे, त्यामुळे आजूबाजूंच्या मतदार संघाचा आढावा घेऊ, असे सुतोवाच त्यांनी केले आहे.

# हिमाचलमध्ये मान्सूनचा कहर

## ५ ठिकाणी ढगफुटी, अरवी इमारत कोसळली, ४ जणांचा मृत्यू तर ५० जण बेपत्ता



**हिमाचल प्रदेश :** मान्सूनच्या पावसाने कहर केला आहे. कुल्लू जिल्ह्यातील मणिकर्णातील मलाना गावात बांधण्यात आलेल्या वीज प्रकल्पाचा बांध फुटला आहे. बंधारा फुटून खोऱ्यात पूर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. मध्यरात्री पडलेल्या पावसामुळे बियास नदीचा प्रवाह ही वाढला आहे. मनाली शहराजवळ व्हास नदीने रस्त्यांचे नुकसान केल्याचे पाहायला मिळत आहे.

भूस्खलनामुळे चंदीगड मनाली राष्ट्रीय महामार्ग अनेक ठिकाणी बंद आहे. दरम्यान अनेक घरे, शाळा आणि रुग्णालयांचे नुकसान झाले आहे. चार ठिकाणांहून सुमारे ५० लोक अद्याप बेपत्ता आहेत. चार मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मंडी जिल्ह्यात ३५ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. ढगफुटीच्या घटनेनंतर आज (१ ऑगस्ट) मंडई परिसरातील सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत. डीसींनी आदेश जारी केले आहेत. कुल्लूमध्येही २ ऑगस्टला सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत.

पार्वती नदीला पूर आल्याने भुंतर परिसरातील लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पार्वती आणि बियास नदीत शाळा आणि घरे वाहून गेली आहेत. पार्वती नदीत मणिकरण खोऱ्यातील भाजी मार्केट वाहून गेले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लेह मनाली हायवे पलचनजवळ बंद करण्यात आला आहे. याशिवाय बियास नदीच्या भीषण स्वरूपामुळे चंदीगड मनाली राष्ट्रीय महामार्ग अनेक ठिकाणी तुटला आहे. सध्या कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. दुसरीकडे पार्वती नदीच्या पुरात भाजी मार्केटची मोठी इमारत वाहून गेल्याची माहिती मिळाली आहे.

मंडईतील थलतुखोड येथे मध्यरात्री झालेल्या ढगफुटीने मोठी नासधूस केली. मुसळधार पावसामुळे ७ मजली इमारती कोसळली आहे. रस्ते संपर्कही ठप्प झाले आहे. थलतुखोड पंचायत प्रमुख काली राम यांनी सांगितले की, तेरंग आणि राजबन गावात ढगफुटीची घटना घडली आहे. या घटनेत अनेक जण बेपत्ता आहेत.



# आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते कळंबा तलावाचं विधिवत पाणी पूजन

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरासह कळंबा आणि पाचगांवची तहान भागवणारा, १४१ वर्षे पूर्ण केलेला ऐतिहासिक कळंबा तलाव बुधवारी २४ जुलै रोजी तुडुंब भरून सांडव्यावरून पाणी वाहू लागलंय. या कळंबा तलावातील नव्या पाण्याचं विधीवत धार्मिक कार्यक्रमानं आ. ऋतुराज पाटील यांच्या हस्ते आज पूजन करण्यात आले. सुरुवातीला कळंबा गावच्या सरपंच सुमन गुरव यांनी आ. ऋतुराज पाटील यांच स्वागत केलं. पांडुरंग कुलकर्णी यांनी पौरोहित्य केले.

यावेळी कळंबा गावच्या सरपंच सुमन गुरव, उपसरपंच सोनल उर्फ नितीश शिंदे , माजी सरपंच विश्वास गुरव, ग्रामपंचायत सदस्य संदीप पाटील, विकास पोवार - बावडेकर, रोहित मिरजे, उदय जाधव, रोहित जगताप, मीना गौड, वैशाली रोपळकर, पुनम जाधव, माजी सरपंच सागर भोगम, माजी उपसरपंच केरबा पाटील, दिलीप मिरजे, करवीर पंचायत समितीचे माजी सभापती दिलीप टिपुगडे, उत्तम जाधव, बंडोपंत मगदूम, युवराज पाटील, मारुती पोवार -बावडेकर यांच्यासह कळंबा ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

दरम्यान, या परिसरातील धोदानी पाणंदीचं खडीकरण करण्यासाठी सहकार्य करावे, या मागणीचं निवेदन शेतकऱ्यांच्या वतीनं मारुती पोवार - बावडेकर आणि बंडोपंत मगदूम यांनी आमदार ऋतुराज पाटील यांना दिलं. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल, असं आ. ऋतुराज पाटील यांनी यावेळी सांगितले.

# पाटण महसूल विभागाच्या वतीने महसूल पंधरवडा निमित्त भरगच्च कार्यक्रम

## पत्रकार परिषदेत तहसीलदार अनंत गुरव यांची माहिती

**पाटण :** शासनाच्या वतीने १ ऑगस्ट रोजी राज्यभर महसूल दिन साजरा करण्यात येतो, यानिमित्ताने राज्यभर १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत महसूल पंधरवडा- २०२४ साजरा करण्यात येत आहे. पाटण महसूल विभागाच्या वतीने महसूल पंधरवडा साजरा करण्यात येत असून या निमित्ताने पाटण तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तहसीलदार अनंत गुरव यांनी दिली.

पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना तहसीलदार गुरव म्हणाले, राज्यभर महसूल पंधरवडा साजरा होणार आहे. या महसूल पंधरवड्यात प्रत्येक दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विशेष मोहिम, कार्यक्रम, उपक्रम, शिबिरे, महसूल अदालत यांचे आयोजन करण्यात येणार आहे. महसूल पंधरवडा निमीत्ताने १ ऑगष्ट ते १५ ऑगष्ट दरम्यान अनेक सामाजिक कार्यक्रम आहे. दि १ ऑगष्ट रोजी महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ, मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजना दि. २ ऑगष्ट ला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, दि ३ ऑगष्ट मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, दि ४ ऑगष्ट स्वच्छ व.सुंदर माझे कार्यालय,दि.५ ऑगस्ट कृषी मार्ग दर्शन कार्यक्रम, दि ६ ऑगस्ट शेती ,पाऊस आणि दाखले, दि. ७ ऑगस्ट युवा संवाद, दि ८ ऑगस्ट महसुल- जन संवाद, दि. ९ ऑगस्ट महसूल -ई प्रणाली, दि. १० ऑगस्ट सैनिक हो तुमच्यासाठी, दि. ११ ऑगस्ट आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन,दि.१२ ऑगस्ट एक हात मदतीचा - दिव्यांगांच्या कल्याणाचा ,दि. १३ ऑगस्ट महसूल अधिकारी /कर्मचारी प्रशिक्षण, दि. १४ ऑगस्ट महसूल पंधरवडा वार्तालाप, दि. १५ ऑगस्ट महसूल संवर्गातील कार्यरत /सेवानिवृत्त /अधिकारी,कर्मचारी संवाद ,उत्कृष्ट अधिकारी/ कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवडा सांगता समारंभ होणार आहे. तरी या कार्यक्रमांचा व योजनांचा लाभ सर्वांनी घ्यावे असे आवाहन तहसीलदार अनंत गुरव यांनी केले आहे.




### पाटणच्या तहसीलदारांनी बनवला महत्वपूर्ण लोगो

राज्य भर महसूल सप्ताह साजरा करत असताना अनेक योजना यामध्ये समाविष्ट आहेत. समाज उपयोगी बाबी व लोकांचा सहभाग यामध्ये वाढावा यासाठी अनेक गोष्टी महसूल सप्ताहात आहेत. हा सप्ताह करताना यासाठी विशिष्ट असा लोगो असावा अशी संकल्पना मनात ठेऊन अतिशय नेटका आणि सुबक आकर्षित असा लोगो तहसीलदार अनंत गुरव यांनी साकारला आहे. या लोगोची चर्चा सर्वत्र होत असून अनेकांची तहसिलदारांचे कौतुक केले.

# नागरिकांचे जीवनमान उंचावण्याकरीता महसूल विभागाने काम करावे : डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

**वडगाव मावळ :** राज्य शासनाच्यावतीने विविध लोककल्याणकरी योजना राबविण्यात येत असून त्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचवून या योजनांच्या माध्यमातून त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता महसूल विभागाने काम करावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

मावळ तालुक्यात वडगाव येथे महसूल पंधरवड्याच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.), उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख आदी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, राज्य शासनाच्यावतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना अशा विविध महत्त्वकांक्षी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याकरीता सर्व संबंधित विभागाने काम करावे. शासनाचा महत्वाचा अंग म्हणून महसूल विभाग ओळखला जात असून विभागाच्यावतीने सर्व संबंधित विभागाच्या मदतीने विविध योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात येते. नागरिक आणि प्रशासन यांच्यामधला दुवा म्हणून महसूल विभाग करत असल्याने विभागाच्या कामकाजावरुन नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असतो, ही बाब विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लक्षात ठेवून काम करावे.



स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय ही संकल्पना मनात ठेवून आपले कार्यालय आणि परिसर स्वच्छ व सुंदर ठेवावे. प्रत्येकांनी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक दिली पाहिजे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या गेल्या पाहिजे, अडीअडचणीच्या अनुषंगोन सर्वांगीण विचार करुन न्यायिकदृष्टिकोन समोर ठेवून मार्ग काढला पाहिजे. दैनंदिन प्रकरणे रोजच्या निकाली काढावी. बदलत्या काळानुसार अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवले पाहिजे. शासनाच्यावतीने समाजाची सेवा करण्याची संधी देण्यात आली आहे, त्याला पुरेपूर न्याय दिला गेला पाहिजे.

महसूल पंधरवड्यात १५ ऑगस्टपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून याकामी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, आपले प्रलंबित विषय मार्गी लावून घ्यावेत. लोकप्रतिनिधी व नागरिकांनी कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्याबाबत वरिष्ठांना माहिती द्यावी, त्यामध्ये नक्की सुधारणा करण्यात येईल, असे डॉ. पुलकुंडवार म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पात्र महिलांना लाभ घ्यावा- डॉ. पुलकुंडवार*

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा २१ ते ६५ वयोगटातील महिलांनी अर्ज सादर केलेल्या अर्जाची छाननी प्रक्रिया मोहीम स्तरावर सुरू करण्यात आली आहे. पात्र ठरणाऱ्या महिलांना जुलै आणि ऑगस्ट महिन्याचा लाभ लवकरच त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. अद्यापही अर्ज सादर न केलेल्या महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करावे असे आवाहन त्यांनी केले. समाजातील सर्व पात्र महिलेला या योजनेच्या लाभ देण्यासाठी महसूल विभागाच्यावतीने देण्यात येणारे दाखले वेळेत उपलब्ध करुन घ्यावे, असे निर्देशही डॉ. पुलकुंडवार यांनी दिले.

आमदार श्री. शेळके म्हणाले, शासनाच्या विविध योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचविण्याकरीता गावपातळी ते जिल्हा पातळीपर्यंत प्रशासन काम करीत असते. प्रशासनाकडून तालुक्यातील नागरिकांच्या तक्रारी, समस्या, अडीअडचणी सोडविण्याकरीता नेहमी प्रयत्न केले जातात. लोकप्रतिनिधी या नात्याने शासनास सर्वतोपरी मदत करण्यात येईल असे श्री. शेळके म्हणाले.

# कोल्हापूर जिल्ह्यात ईव्हीएम मशीनची चाचणी



**कोल्हापूर :** जिल्हा निवडणूक विभागाच्या पातळीवर आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. याच्या पहिल्या टप्प्यात गुरुवारपासून ईव्हीएम मशीनची प्राथमिक तपासणी सुरू होणार आहे. जिल्ह्यासाठी बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट, असे १८ हजार ११८ मशीन दाखल झाले आहेत. शासकीय गोडावून येथे ४० दिवस मशीनची तपासणी सुरू राहील.

आगामी विधानसभा निवडणुकीचे पडघम आता वाजू लागले आहे. त्याच्या राजकीय घडामोडीही सुरू झाल्या आहेत. पूरग्रस्तांना भेटण्यासाठी त्यांना मदत करण्यासाठी ज्या उड्या पडल्या, त्यामागेही विधानसभेचेच कारण आहे. मेळावा, सभा, बैठका घेऊन त्यासाठीच्या जोरबैठका इच्छुक मारू लागले आहेत. त्यातच आता निवडणुकीची तयारी प्रशासनाकडूनही सुरू झाली आहे. विधानसभेसाठी जिल्ह्यात बेल कंपनीचे १८ हजारांवर मशीन दाखल झाले आहेत. या मशीनची प्राथमिकस्तरीय तपासणी शासकीय गोडावून येथे गुरुवारपासून सुरू होत आहे. त्यासाठी बेल कंपनीचे ६ अभियंते कोल्हापुरात आले आहेत.

नोडल अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी विवेक काळे यांची व सहायक पर्यवेक्षण अधिकारी म्हणून नायब तहसीलदार जयंत गुरव व शिवाजी गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासह ३० हमाल कर्मचारी व १० अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. गुरुवारपासून पुढील ४० दिवसांत ही प्राथमिक तपासणी पूर्ण केली जाणार आहे. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे हे नियोजन करत आहेत.

निवडणूक आयोगाने पूर्वी दिलेल्या कार्यक्रमानुसार प्रारूप मतदार यादी २५ जुलै रोजी प्रसिद्ध होणार होती; मात्र आता त्याची मुदत वाढविण्यात आली आहे. नव्या कार्यक्रमानुसार शुक्रवारी (दि. २ ऑगस्ट) प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल. १६ तारखेपर्यंत त्यावरील हरकती स्वीकारल्या जातील. २३ तारखेपर्यंत हरकती निकाली काढल्या जातील आणि २७ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल.

# काँग्रेसच्यावतीने शनिवारी टोल नाक्यांवर आंदोलन

**कोल्हापूर :** पुणे - कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाची झालेली दुरावस्था त्यातच सुरु असलेली टोल वसुली या विरोधात शनिवारी ३ ऑगस्ट रोजी काँगेसच्यावतीनं टोल नाक्यांवर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आ. सतेज पाटील यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पत्रकार परिषदेत दिली.

कोल्हापूर - पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील किनी टोलनाका, कराड येथील तासवडे टोलनाका, सातारा येथील आणेवाडी टोलनाका आणि पुणे येथील खेड - शिवापूर टोल नाका या चार टोलनाक्याच्या ठिकाणी त्या त्या जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आंदोलन करणार आहेत.

राष्ट्रीय महामार्गाचे काम गेली अनेक महिने सुरू आहे. रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. पुणे - कोल्हापूर, हे सुमारे २५० किलो मीटर अंतर पार करण्यासाठी तब्बल आठ तासांचा वेळ लागतो.

रस्तावर मोठे खड्डे पडले आहेत. वाहनधारकांना कोणत्याही सुविधा मिळत नाही. अशातच, टोल वसुली मात्र जोमाने सुरु आहे. या विरोधातच काँगेस आक्रमक झाली असुन, रस्त्यावर उतरून आता टोल नाक्यावर आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलना वेळी वाहनधारकांची अडवणूक केली जाणार नाही. लोकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल, असही आमदार सतेज पाटील यांनी सांगितलं. जोपर्यंत रस्त्यांच काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल वसुली थांबवावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केलीय.

यावेळी बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी, आंदोलनाची जी दिशा ठरेल त्याप्रमाणे काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होतील. जोपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल आकारणी नको, अशी मागणीही त्यांनी केली.

व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या या पत्रकार परिषदेत आ. विश्वजीत कदम, आ. ऋतुराज पाटील, आ.जयश्री जाधव यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे या जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# टोयोटा करणार महाराष्ट्रात पदार्पण, मराठवाड्यात इलेक्ट्रिक कार उत्पादन प्रकल्प

**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच शिवाय एकूणच भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगातदेखील एक क्रांती येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. आज सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, किर्लोस्कर मोटर्सच्या उपाध्यक्ष मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, टाटा किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक मसाकाझु योशीमुरा, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे. एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे.

**ई क्रांती येणार**

टोयोटाच्या या प्रकल्पामुळे भारताच्या ई कार्स निर्मिती उद्योगात क्रांती येईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य शासनदेखील इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असून सार्वजनिक वाहतूक यंत्रणेतदेखील वाहनांचा वापर वाढवला आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग केंद्र उभारण्यासाठी कायद्यात आवश्यक ते बदल केले आहेत. राज्यात सर्वोत्तम दळणवळण, कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि जागा उपलब्ध आहे. टोयोटाचे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि आमचे कुशल मनुष्यबळ याची चांगली सांगड होईल. राज्यात शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, गृहनिर्माण अशा सुविधा मुबलक उपलब्ध असून कोणत्याही उद्योगाच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आनंदाने राहता येईल असे वातावरण आहे. राज्य विदेशी गुंतवणुकीत अग्रेसर असून गेल्या दोन वर्षात दावोस येथे झालेल्या ६० दशलक्ष डॉलर्सच्या करारांची ८० टक्के अंमलबजावणी झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

आपल्या भाषणाची सुरुवात मुख्यमंत्र्यांनी जपानी भाषेत नमस्कार म्हणजे कोनीचिवा असे संबोधून केली तर आभारदेखील एरीगेटो गोझामासू अशा शब्दात मानले.

यावेळी या कराराचे वर्णन 'ऐतिहासिक' या शब्दात करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात अनेक ऑटोमोबाईल सेक्टर आहेत पण टोयोटा नसल्याने ते अपूर्ण होते. आता राज्यात टोयोटा असल्याने हे सेक्टर पूर्ण झाले आहे. मराठवाड्यातील चेंबर ऑफ कॉमर्स समूह या उद्योगासाठी शासनाच्यावतीने सर्वोतोपरी सहकार्य करेल. या गुंतवणुकीमुळे मराठवाड्यात रोजगार निर्मिती तर होणारच आहे पण आर्थिक प्रगतीही साध्य होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर करण्याकडे वाटचाल सुरु केली आहे.

# दौंड स्टेट बँकेतील ८३ खाती गोठवली

**दौंड :** दौंड येथील स्टेट बैंक शाखेतील ८३ खाती पोलिसांडुन गोठवणयात आल्याने बँकेत बोगस खाते ऊघडुन गैर व्यवहार करणारे प्रचंड हादरले आहेत.

दौंड शहरातील व्यावसाईक हे स्टेट बैंक शाया खेत खाते ऊघडुन काळा पैसा पांढरा करण्याची नामी शक्कल लढवित आहेत. यामधे अनेकांनी पैशाचे आमिष दाखवून आर्थिक लुबाडणुक केलेली आहे.

या प्रकरणी दौंड पोलिस ठाण्यात तक्रारी आल्याने याबाबत दौंड पोलासांनी ८३ खाती गोठवली आहेत.

या प्रकरणी सभंथित खातेदार यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निनिक्षक संतोष डोके यांनी दिली आहे.

दौंड शहरात काळा पैसा पांढरा करण्याच मोठे रॅकेट आहे. हा वयवसाय दौंडमधे मोठया प्रमाणात सुरु आहे. या व्यवसायात मुरलेले लोक आमचे कोणीही वाकडे करू शकत नाही. अशी शेखी मिरवत असत. मात्र पुणे ग्रामिण पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांनी या प्रकरणी दखल घेऊन या प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची सुचना दौंडपोलासांना दिले होते. यावरुन दौंड पोलिसांनी गुन्है दाखल केले. या प्रकरणी ३० जुलै रोजी अनिता शाालेम गुंजी रा गोवा गली दौंड यांचे सह ८३ लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे त.

याबाबत स्टेट बैंक शाख अधिकारी विपुल अजय जैन वय ३६ यांनी तक्रार दिली आहे.या प्रकरणी पोलिसांनी काही संशयीत खात्याचा तपास केला असता हा सर्व प्रकार पुढे आला.या बाबत पुढील तपास पुणे ग्रामीणचे आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक युवराज पाटील हे करीत आहेत.

या प्रकाराने दौंड शहरात प्रचंड खळबळ उडाली असून यामधे अनेक मोठे मासे गळाला लागण्याची जोरदार चर्चा आहे.

# माजी नगरसेवकाचे कोल्हापूरच्या खड्ड्यात अनोखे आंदोलन



**कोल्हापूर :** मुसळधार पावसाने शहरातील रस्त्यांवर अक्षरशः दाणादाण उडाली आहे. शहराबरोबर उपनगरातील रस्त्यांवर खड्डयांचा साम्राज्य निर्माण झाले आहे. तर काही रस्त्यांवर पावसाळ्यापूर्वी खडीकरण आणि डांबरीकरण करावे, अशी मागणी या भागातील माजी नगरसेवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी महापालिकेकडे केली होती. मात्र, सातत्याने मागणी करून ही फुलेवाडी रिंग रोडचे काम केले नसल्याने माजी नगरसेवकाने थेट रस्त्यावरील खड्डयात उडी घेऊन पोहून उपरोधिक आंदोलन केले.

गेली कित्येक वर्षे या रिंग रोड येथील खड्ड्यांचा विषय गाजत आहे.यापूर्वी उपनगर समितीने अनेक आंदोलने केली.प्रत्येक वेळी आश्वासन शिवाय काहीच पदरात पडले नाही.या रिंग रोड वर यापूर्वी कित्येक निरपराध नागरिकांचा खड्ड्यात पडून हकनाक जीव गेला आहे. आज प्रशासनाचा निषेध म्हणून पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पोहून प्रशासनाचा निषेध करण्यात आला.

आंदोलनात सुहास आज गेकर , सनी वनारसे,बबलू फाले, राहुल नरके,कुमार चौगुले ,शेषाद्री कोत मिरे,सिद्धार्थ मोरे, जीवक नाईक ,महादेव मेस्त्री, दुर्गेश बामणे,केदार करकरे आदी नागरिक सहभागी झाले होते.



## दौंड तालुका बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी गिरमकर

**देऊळगाव राजे :** दौंड तालुका बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी गिरमकर यांची निवड दौंड तालुका बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी देऊळगाव राजे येथील ड.प्रशांत बापूसाहेब गिरमकर यांची निवड झाली आहे तर उपाध्यक्षपदी ड.संदीप येडे यांची निवड झाली आहे तर सचिव पदी ड.अजित दोरगे यांची तसेच सहसचिवपदी ड.ऋषीकेश काकडे व सदस्यपदी-ड.ओंकार चौधरी,ड. अश्लेषा शेलार ड.निखिल शिंदे ड.तुकाराम शेळके यांची निवड झाली आहे. अध्यक्ष पद,उपाध्यक्ष पद आणि सचिव पदासाठी प्रत्येकी दोन उमेदवार रिंगणात होते, असोसिएशनचे एकूण २५६ सभासद आहेत त्यापैकी २३९ सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला होता ही निवड पुढील एक वर्षासाठी आहे , मावळते अध्यक्ष ड. कैलास गायकवाड यांचा कार्यकाल संपल्याने ही निवडणूक पार पडली,यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून माजी अध्यक्ष ड. कैलास गायकवाड व माजी सचिव ड. दत्तात्रय पाचपुते यांनी काम पाहिले.

## मुंबईत काँग्रेस मागणार पंधरा जागा, आघाडीत बिघाडीची शक्यता

**मुंबई:** शिवसेनेचे वर्चस्व असणाऱ्या मुंबईतील ३६ पैकी तब्बल १५ जागांवर काँग्रेस दावा करणार आहे. त्यापैकी काही जागांवर शिवसेनेचे विद्यमान आमदार आहेत. या मुद्द्यावरून महाविकास आघाडीत जागावाटपादरम्यान बिघाडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लोकसभा निवडणुकीत दमदार कामगिरी केल्यानंतर काँग्रेसचा आत्मविश्वास दुणावला आहे. मुंबईतील सर्व ३६ विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेसने निरीक्षक नियुक्त केले आहेत. हे निरीक्षक प्रत्येक मतदारसंघाला भेट देऊन त्या मतदारसंघात कोणत्या पक्षाचा अधिक प्रभाव आहे, कोणत्या संभाव्य उमेदवाराला मतदारांकडून अधिक पसंती दिली जाऊ शकते, यासंबंधीचा सविस्तर अहवाल पक्षश्रेष्ठींना सादर करणार आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सावळजच्या ‘स्मार्ट पीएचसीला’ गळती

## निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशीची मागणी, अनेक समस्या मात्र लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

**तासगांव :** प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय सेवा आणि सुविधांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषदेने सावळज प्राथमिक आरोग्य केंद्रांचा स्मार्ट पीएचसीमधून विकास केला आहे. मात्र लोकार्पण सोहळ्याच्या अगोदरच स्मार्ट पीएचसीच्या नवीन इमारतीला मोठी गळती लागली आहे. पावसामध्ये मीटिंग हालमध्ये गळतीचे पाणी मोठ्या प्रमाणात साचुन राहत आहे. त्यामुळे या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्राचा उपचारांसाठी आधार आहे. म्हणून तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्मार्ट पीएचसी ही योजना राबविली होती. या योजनेसाठी जिल्ह्यातील ६४ आरोग्य केंद्रापैकी ४७ आरोग्य केंद्राची निवड केली होती. त्यापैकी सावळज येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा स्मार्ट पीएचसीत समावेश आहे.

येथील जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. या केंद्रात स्मार्ट पीएचसीची निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली आहेत. या केंद्रात नव्याने बांधण्यात आलेल्या मीटिंग हॉलला मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. पावसामुळे हॉलमध्ये गळतीचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत असल्याने वारंवार कर्मचाऱ्यांना पाणी बाहेर काढावे लागत आहे. त्यामुळे कर्मचारी त्रस्त झाले आहेत. अतिशय निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिकांच्यातुन संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे या स्मार्ट पीएचसीच्या बांधकामाची चौकशी करावी व संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांच्यातुन जोर धरू लागली आहे.

लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, आरोग्य सेवेचा बोजवारा

सावळज प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीला लोकार्पण सोहळ्या अगोदरच गळती लागली आहे. स्मार्ट पीएचसीत अद्याप नवीन यंत्रसामुग्री उपलब्ध झाली नाही, आरोग्य सेवा पुरविण्यासाठी कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे, आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली आहे अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. मात्र याकडे आरोग्य दक्षता समिती, स्थानिक नेते, लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष झाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सेवा सुविधांचा बोजवारा उडाला आहे.

# आधी उत्तरे देण्यास टाळाटाळ, नंतर नॉट रिचेबल; पूजा खेडकर देश सोडून पसार?



**पुणे :** वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्याबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. अटकेच्या भितीने पुजा खेडकर परदेशात पळून गेल्याचे सांगण्यात येत आहे. पुजा खेडकर यांचे एक एक कारनामे समोर आल्यानंतर युपीएससी सह त्यांच्या मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री प्रशिक्षण अकादमीने त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला होता. त्यानंतर दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयानेही त्यांचा अटकपूर्व जामीन फेटाळून लावल्यानंतर कोणत्याही क्षणी त्यांना अटक होण्याची शक्यता होती. या अटकेच्या भितीने त्यांनी देश सोडल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पण यासंदर्भात अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या पूजा खेडकर यांनी युपीएससीची दिशाभूल करून पद मिळवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. पूजा खेडकरने इतर मागासवर्ग प्रवर्गातून पूजाने १२ वेळा णझडउ परीक्षा दिल्याची माहिती उघड झाली. युपीएससी मिळवण्यासाठी तिने अपंगत्वाचे खोटे प्रमाणपत्र दिले. प्रशिक्षणार्थी असतानाही वरिष्ठांना धमकावणे, त्यांच्या केबिन बळकावणे अशा प्रकारामुळे त्यांचे पितळ उघडे पडले. याप्रकरणी युपीएससी बोर्डाने पूजाचे प्रशिक्षण थांबवून तिला मसुरी येथील प्रशिक्षण केंद्रात तातडीने हजर राहण्याचे आदेश दिले. खेडकर तिथे मसूरीतील अकादमीत हजर राहतील असे वाटत होते, पण तेव्हापासूनच त्या जाताच नॉट रिचेबल आहेत.

याप्रकरणी दिल्ली पोलिसांत पूजा खेडकर विरोधात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी तिला समन्स बजावून चौकशीला हजर राहण्याचे आदेस दिले. तीन वेळा समन्स बाजावूनही त्यांनी खेडकर चौकशीला हजर राहिली नाही. अटकेच्या भीतीने त्यांनी दिल्लीतील पटियाला हाऊस कोर्टात धाव घेत अटकपूर्व जामीन अर्ज केला. पण न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

# देवेंद्र फडणवीस हे उत्कृष्ट संघटक’ ; राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या चर्चांवर बावनकुळेंचे सूचक विधान



**नागपूर :** लोकसभेची निवडणूक मागील महिन्यामध्ये पार पडली. यामध्ये आलेल्या निकालानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व निकालाची जबाबदारी घेत राजकारणातून संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त केली. याचबरोबर संघटनात्मक काम करण्याची इच्छा देखील व्यक्त केली होती. यानंतर आता देवेंद्र फडणवीस हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या चर्चांवर आता भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत सूचक विधान केलं आहे. केंद्रीय नेतृत्व योग्य तो निर्णय घेतील, अशी प्रतिक्रिया चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी संवाद साधताना दिली आहे.

**काय म्हणाले चंद्रशेखर बावनकुळे?**

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत सुरु असलेल्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, देवेंद्र फडणवीस हे नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नागपूर जिल्ह्याच्या विकासासाठी १२०० कोटीहून अधिक रुपयांचा निधी दिला. या जिल्ह्याच्या विकासासाठी, शेतकऱ्यांसाठी, शेतमजूरांसाठी, जिल्ह्यातील रस्त्यांसाठी, जिल्हा परिषदेच्या कामांसाठी तसेच जवळपास ७५ वेगवेगळ्या विभागांसाठी विकास कामे केली जाणार आहेत. कधी काळी २०० कोटी रुपये नागपूरसाठी मिळायचे. मात्र, आता १२०० कोटी रुपये नागपूर जिल्ह्याला मिळाले आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचे आम्ही आभार मानतो, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

**बावनकुळेंचं फडणवीसांबाबत सूचक विधान**

देवेंद्र फडणवीस हे उत्कृष्ट संघटक आहेत. शासन आणि प्रशासनामध्ये काम करण्याचा त्यांचा मोठा अनुभव आहे. त्यामुळे संघटनेला मोठा फायदा होईल. मात्र, याबाबत केंद्रीय नेतृत्व योग्य तो निर्णय घेतील. पण माझ्या दृष्टीने केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतल्यास आम्हाला मान्य राहील. मात्र, महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेसाठी त्यांचं येथील सरकारमधील स्थान महत्वाचं आहे. तसंच संघटनेमधीलही स्थानही महत्वाचं आहे. त्यामुळे आम्हाला हेच वाटेल की देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात राहावं. कारण ते आमचे नेते आहेत, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानानंतर चर्चांना उधाण आले आहे.

# उंबार्ली येथील जागा सर्वेक्षणास शेतकऱ्यांचा विरोध

**पुणे :** कल्याण-उंबार्ली परिसरात जागेच्या मालकी हक्कावरुन शेतकरी आणि एका बिल्डरचा वाद सुरु आहे. बिल्डरकडून जागेच्या सर्वेक्षणासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. घटनेची माहिती मिळताच शिवसेना शहर प्रमुख राजेश मोरे घटनास्थळी पोहचले. दोन दिवसात बिल्डरआणि शेतकरी यांना बसवून या प्रकरणी तोडगा काढला जाईल असे आश्वासन दिले आहे.



उंबार्ली गावात साडे सहा एकरची जागा आहे. या जागेच्या सर्वेक्षणाकरीता खाजगी बिल्डरने कर्मचारी बोलावले होते. या जागेवर मालकी हक्का संबंधीत वाद असल्याने सर्वेक्षणाकरीता आलेल्या कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. या घटनेची माहिती मिळताच त्याठिकाणी पोलिस पोहचले. सर्वेक्षणाला विरोध झाल्याने हा वाद जवळपास चार ते पाच तास सुरु होता. सर्वेक्षणाला विरोध करण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांसोबत महिला वर्गही मोठ्या प्रमाणात होता. महिला आणि शेतकरी यांनी त्यांच्या हातात डिझेलने भरले कॅन आले होते. त्यामुळे या ठिकाणी तणाव निर्माण झाला होता. तणावाची परिस्थिती पाहता त्याठिकाणी डोंबिवली शिवसेना शहर प्रमुख राजेश मोरे घटनास्थळी पोहचले. शहर प्रमुख मोरे यांनी सांगितले की, येत्या दोन दिवसात बिल्डरआणि शेतकरी यांना एकत्रित बसवून या प्रकरणी तोडगा काढला जाईल असे आश्वासन दिले आहे. मोरे यांनी दिलेल्या आश्वासनानंतर शेतकरी मागे फिरले.

# उध्दव ठाकरेंच्या देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या ‘त्या’ आवाहनाला, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून जोरदार प्रत्युत्तर !



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. घरात बसून फेसबुकवर सरकार चालविणाऱ्यांनी मैदानात उतरायची भाषा करु नये. एखाद्याला संपवायच असते तर मनगटामध्ये दम लागतो. अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उध्दव ठाकरेवर केली आहे.

उध्दव ठाकरेंवर हल्ला बोल

उध्दव ठाकरे यांनी मुंबईत पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केल होते. त्यानंतर भाजप पक्षातील नेत्यांनीही ठाकरेंवर टीका केली होती. उध्दव ठाकरे म्हणाले होते की, देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या कुटुंबाला त्रास दिला. आता एक तर ते राहतील किंवा मी राहीन अशीच लढाई मी लढत आहे. त्यावर मुख्यमंत्र्यानी म्हटले की, महाविकास आघाडी सरकार आणि महायुती सरकारची तुलना केल्यास राज्य सरकार जो विकास करत आहे, योजना आणत आहे त्यामुळे सर्व विरोधक गोंधळलेले आहेत.देवेंद्र फडणवीस अख्खा महाराष्ट्र तुमच्या पाठीशी आहे. येत्या निवडणूकीत पुन्हा महायुतीच सरकार येणार आहे. एखाद्याला संपवायच असेल तर मनगटात दम लागतो त्यामुळे घरात बसून फेसबुकवर सरकार चालवणाऱ्याचं ते काम नाही. उबाठाची जी उरली सुरली शिवसेना आहे ती त्यांनी वाचवावी.

पॅरिस ऑलम्पिक २०२४ मध्ये कोल्हापूरच्या स्वप्नील कुसळे नेमबाजीमध्ये कांस्य पदक पटकावल. त्याबद्दल एकनाथ शिंदे यांनी त्याचं अभिनंदन केलं. ते म्हणाले की, स्वप्निल कुसाळेने ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी चांगली कामगीरी केल्याबद्दल त्याचे आणि त्याच्या पालकांचे अभिनंदन करतो. राज्य सरकारतर्फे स्वप्नील कुसळेला १ कोटी रुपये बक्षीस देण्याची घोषणा ही मुख्यमंत्र्यांनी केली.

# मागील थकबाकीची रक्कम ३१ ऑगस्टपर्यंत देणार

## नियोजन भवनातील बैठकीत कारखाना प्रतिनिधींची हमी

**सातारा :** जिल्ह्यात १८ साखर कारखाने आहेत. त्यापैकी पाच कारखान्यांनी मागील हंगामात गाळपासाठी घेतलेल्या शेतकऱ्यांकडून घेतलेल्या ऊसाचे पैसे थकित ठेवले आहेत. ही थकीत रक्कम ३१ ऑगस्टपर्यंत देऊ, असे आश्वासन थकित कारखान्यांच्या प्रतिनिधींनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत दिले.



बैठकीत मार्गदर्शन करताना नागेश पाटील समवेत थकीत कारखान्यांचे प्रतिनिधी.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनाच्या सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीला जिल्हा उपनिबंधक मनोहर माळी, लेखा विभागाचे संजय गोंदे, जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक, साखर आयुक्त कार्यालय व लेखा विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील १८ कारखान्यांपैकी किसन वीर भुईंज, किसन वीर खंडाळा साखर कारखाना, लोकनेते बाळासाहेब देसाई कारखाना, ग्रीन पॉवर गोपुज, प्रतापगड सहकारी या साखर कारखान्यांकडे शेतकऱ्यांची ऊसाची बिले थकली आहेत.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी राजू शेळके, अर्जुनराव साळुंखे यांनी शेतकऱ्यांच्या थकित रकमेचा मुद्दा या बैठकीत उचलून धरला. अनेक कारखान्यांनी बैठकीला येण्यापूर्वीच थकित रकमा शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केल्या. याचे पुरावे यावेळी सादर केले. मात्र, ज्या कारखान्यांनी अजूनही थकित रकमा दिलेल्या नाहीत.

**वाईच्या प्रांताधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी**

**किसन वीर साखर कारखान्याने शेतकऱ्यांची बिले अनेक वर्षांपासून रखडवली आहेत. थकित बिले मिळत नसल्याने शेतकरी हतबल असून या कारखान्यावर आरआरसीची कारवाई करण्याचे शासनाचे आदेश मिळूनही वाईच्या प्रांताधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राजू शेळके यांनी या बैठकीत दिला.**




# आ. शिवेंद्रसिंहराजे यांचे अधिकृत फेसबुक पेज हॅक

## पेज अनफ़ॉलो करण्याचे जनसपंर्क कार्यालयाकडून आवाहन

**सातारा :** सातारा-जावली मतदारसंघाचे आ. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे फेसबुक वरील Chh.ShivendraRaje Bhonsle हे अधिकृत फेसबुक पेज अज्ञात हॅकरने दि. २३ ऑगस्ट २०२३ रोजीच हॅक केलेले आहे. त्याचवेळी याबाबत सातारा पोलिसांच्या सायबर सेलकडे आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून रीतसर तक्रार करण्यात आली असून संबंधित हॅकरवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. सुमारे ११ महिन्यानंतर या पेजवर संबंधित हॅकरने अश्लील पोस्ट टाकण्यास सुरुवात केली आहे. हॅकरचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरु आहे. या पेजवरील पोस्ट व मजकुराकडे कोणीही लक्ष देऊ नये, तसेच सोशल मीडियावरील सर्वांनीच पेज अनफ़ॉलो करून ब्लॉक करावे, असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यावतीने यांचे जनसंपर्क अधिकारी अमर मोकाशी यांनी केले आहे.

असंख्य फॅन फॉलोईंग असलेल्या आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या Chh. ShivendraRaje Bhonsle या तत्कालीन फेसबुक पेजवर दररोज आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या चालू घडामोडी, कार्यक्रम प्रसिद्ध केले जात होते. मात्र ऑगस्ट २०२३ मध्ये हे पेज हॅक करण्यात आले होते. आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या जनसपंर्क कार्यालयाकडून याबातची रीतसर तक्रार त्याचवेळी सातारा सायबर सेलकडे करण्यात आली होती. याबाबतचे वृत्तही प्रसारमाध्यमांनी त्यावेळी प्रसिद्ध केले होते.

सदर पेजवर कोणतीही अनधिकृत पोस्ट पडल्यास त्यास समबंधित हॅकर जबाबदार असेल. तसेच अनधिकृत पोस्ट पडल्यास आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे कार्यकर्ते, प्रेमी, फॅन्स, नागरिकांनी त्यावर कसलीही प्रतिक्रिया देऊ नये, असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून त्याचवेळी करण्यात आले होते.

दरम्यान, सुमारे ११ महिने फेसबुक पेजवर कोणतीही पोस्ट पडली नव्हती मात्र, अलीकडे म्हणजेच दि. २० जुलै २०२४ रोजी दुपारी ३ नंतर या पेजवर हॅकरने अश्लील पोस्ट टाकण्यास सुरुवात केली आहे. ११ महिन्यांनंतर हे पेज ऍक्टिव्ह करून हॅकर त्यावर आता वारंवार अश्लील पोस्ट टाकत आहे. याबाबत पुन्हा पोलिसांच्या सायबर सेलकडे तक्रार करण्यात आली असून पोलीस हॅकरचा शोध घेत आहेत. हॅक झालेल्या या पेजवर पडणाऱ्या पोस्ट किंवा मजकुराशी आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले अथवा त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा कसलाही संबंध नाही. त्यामुळे सदर पेजवर पडणाऱ्या पोस्टकडे आ. शिवेंद्रसिंहराजे यांचे कार्यकर्ते, प्रेमी, फॅन्स व नागरिकांनी लक्ष देऊ नये, तसेच सोशल मीडियावरील सर्वांनीच हॅक झालेले हे पेज अनफ़ॉलो करावे आणि पेज ब्लॉक करण्यासाठी फेसबुक, मेटाकडे रिपोर्ट करावा.

# तक्रारदाराला नगरपालिकेने दिला गृहपाठ

## साईबाबा चौकातील अतिक्रमणाला मुख्याधिकाऱ्यांचाच हातभार ?

**सातारा :** गोडोली येथील साईबाबा चौकात चारही रस्तावर हातगाडे, टपऱ्या, रस्त्यावर पार्किंग आणि अतिक्रमणाचा चहूबाजूंनी विळखा पडला आहे. यामुळे रोज या चौकात वाहतूक कोंडी आणि त्याचा सर्वांना नाहक त्रास होतो. या चौकातील वाहतूकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यासाठी बांधकाम विभाग पोलीस आणि नगरपालिकेकडे सामाजिक कार्यकर्ते अजय पार्टे यांनी निवेदन दिले. अतिक्रमणाबाबत स्वतः च्या कर्तृत्वात कसूर करणाऱ्या पालिकेच्या मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी सामाजिक कार्यकर्तांला सर्व्हे नंबर सह अतिक्रमण दर्शवून नकाशा सादर करण्याचा गृहपाठ दिला आहे.



सातारा शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यावर असलेल्या गोडोलीतील साईबाबा चौकात चार दिशांनी येणाऱ्या रस्त्यांवर मोठी वर्दळ असते. याच चौकात चहूबाजूंनी अनाधिकृत हातगाडे, टपऱ्या, रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्किंग आहे. यामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने दोन वाहतूक पोलीस आणि दोन वॉर्डन कर्मचारी असून ही तासनतास ट्रॅफिक जॅम होते. याची नगरपालिकेकडून कधीच दखल घेतली जात नाही.बांधकाम विभागाचे अधिकारी फिरकत नाहीत.

अजय पार्टे आणि काही

# आंधळीमध्ये सर्व शाळांना दर शनिवारी विना दप्तर शाळा

## लोकनियुक्त सरपंच दादासाहेब काळे यांनी राबवला अभिनव उपक्रम

**बिदाल :** आंधळी तालुका माण या गावामध्ये लोकनियुक्त सरपंच दादासाहेब काळे यांच्या संकल्पनातून पुढची पिढी सक्षम व सज्ञान बनवण्याच्या दृष्टीने गावातील सर्व शाळांमध्ये दर शनिवारी 'विना दप्तर शाळा' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच विविध उपक्रमाद्वारे मुलांना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील वक्तव्यांचे विचार ऐकण्यास मिळेल. मुलांचे कौशल्य वाढवण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.या उपक्रमाचे कौतुक सर्व स्तरातून केले जात आहे.

ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मनः पूर्वक अभ्यास करावा अभ्यास करत असतानाच विविध शालेय उपक्रमात स्पर्धेत हिरीरीने सहभागी व्हावे मात्र विद्यार्थ्यांनी या वयात आपले लक्ष विचलित न होता अभ्यास करावा तसेच लक्ष विचलित करणारे समाज माध्यमांपासून कटाक्षाने दूर राहावे हा कार्यक्रम अतिशय स्तुत्य उपक्रम असून या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यांना वाव मिळेल. तसेच विविध वक्त्यांच्या विचारातून प्रेरणा व मार्गदर्शन मिळेल. विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडील यांना गुरुजन मानुन त्यांचा आदर व सन्मान केला पाहिजे तसेच आपले ध्येय निश्चित करून त्या दृष्टीने वाटचाल सतत चालू ठेवली पाहिजे. त्यांनी मुलांना तात्या टोपे यांचा इतिहास सांगून ब्रिटिशांविरुद्ध कसा लढा दिला त्यांना कस सळो की पळो करून सोडले यांची जिवंत अशी थरारक कहाणी सर्वांसमोर मांडली.



आंधळी : विना दप्तर शाळा उपक्रम सुरू. (छाया: आकाश दडस )

दादासाहेब काळे म्हणाले,आमच्या शाळेची मुले हीच उद्याच्या समृद्ध आंधळी गावची संपत्ती आहे शाळेतील विद्यार्थ्यांना बाह्य जगाची ओळख व्हावी, मोठी स्वप्न पाहण्याची सवय व्हावी व त्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी

**या कार्यक्रमावेळी मी कसा घडलो या विषयावर सरपंच, जि.प.सदस्य,गटविकास अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी यशदा पुणे याठिकाणी प्रशिक्षक म्हणून काम करणारे विवेक गुरव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

वेगवेगळ्या क्षेत्रातील आदर्श संघर्षमय व्यक्तींच्या यशस्वी जीवन प्रवासाचा उलगडा व्हावा या उद्देशाने आपण विविध उपक्रम शाळेत घेणार आहोत. या कार्यक्रमास सरपंच दादासाहेब काळे, बापूराव काळे, मुख्याध्यापक घनश्याम काळे व दत्तात्रय मगर,तानाजी काळे,जगन्नाथ काळे-पाटिल, संभाजी काळे,दौलत चिखले,संदिप जगताप, संतोष खरात, उत्तम गलांडे, भगवान चव्हाण,अशोक मुलाणी,विजय गोरे ,शिवाजी काळे, सुप्रिया चिरमे , माया वरकड,विद्यार्थी ,ग्रामस्थ तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.

### भाग्यश्री फरांदे यांच्या हस्ते या विशेष आंबा लागवडीचा शुभारंभ करण्यात आला

# जिल्ह्यात पहिल्यांदाच एकाच क्षेत्रात आंब्याच्या ५६ जातींची लागवड

**खंडाळा :** खंडाळा तालुक्यातील असवली येथे महाराष्ट्र शासन कृषी विभागाचा युवा शेतकरी पुरस्कारप्राप्त शेतकरी निलेश हणमंतराव पवार यांच्या क्षेत्रामध्ये आंब्याच्या ५६ जातींची लागवड करण्यात आली. या पद्धतीची लागवड जिल्ह्यात प्रथमच करण्यात आल्याने यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे यांच्या हस्ते या लागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी लागवड करण्यात आलेल्या आंब्याच्या वाणांमध्ये प्रामुख्याने ब्ल्यू मँगो, सिंधू, केशर, राजापुरी, तोतापुरी, टॉमी अटकिन्स, मियाझाकी, केशर, हापूस, पायरी, बनाना, फर्नांडिस, ब्लॅक स्टोन, लिली, क्रोटोन, ऑस्टिन, पामर, वनराज, बाटली हापूस, गोमुखी, हिमसागर, माया, मालदा, नीलम, बजरंग, चंपा, बारमाही, दुधपेढा, मंजिरा, चौसा, सबज्या, गोवा मानकुर, आम्रपाली, मानकुराद, सुवर्ण रेखा, सुवर्णा, मल्लिका, रत्ना, पायरी अमृत, जम्बो केशर, कोकण राज्या, सोनपरी, लंगडा, कोकण सम्राट, मलगोवा, केंट, कोकण रुची, रायवळ देशी अशा देश-विदेशतील वेगवेगळे ५६ वाणांची लागवड करण्यात आली.यावेळी निलेश पवार यांच्या सेंद्रिय पद्धतीने लागवड केलेल्या आंबा फळबाग, सीताफळ फळबाग या लागवडीस जिल्हा अधीक्षक फरांदे यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी खंडाळा तालुका कृषी अधिकारी गजानन ननावरे, मंडळ कृषी अधिकारी खंडाळा वैभव क्षीरसागर, कृषी पर्यवेक्षक खंडाळा लक्ष्मण शिवणकर, प्रमोद खंडागळे, कृषी सहायक कविता पिसाळ, आत्मा विभागाचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक समीर चव्हाण आदी उपस्थित होते.

## सातारा जिल्ह्यात मोबाईल लोकअदालतीचे आयोजन

**सातारा :** सातारा जिलह्यामध्ये ३१ ऑगस्टपर्यंत मोबाईल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या मोबाईल लोकअदालतीचा पक्षकार, विधिज्ञ आणि सर्व वित्तीय संस्था, मोबाईल कंपन्या यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनायक जोशी यांनी केले आहे.

२ ऑगस्ट वाडाकुंभरोशी ता. महाबळेश्वर, चिंधवली ता. वाई येथे ५ ऑगस्ट, ७ ऑगस्ट रोजी खेड ता. खंडाळा, ९ ऑगस्ट रोजी साखरवाडी ता. फलटण, १३ ऑगस्ट रोजी आंधळी ता. माण, १९ ऑगस्ट रोजी सातेवाडी ता. खटाव, २१ ऑगस्ट रोजी कोरेगाव, २३ ऑगस्ट रोजी मल्हारपेठ ता. पाटण व २८ ऑगस्ट रोजी उंब्रज ता. कराड येथे मोबाईल अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

## मालोजीराजे विद्यालयात खंडाळा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा नियोजन बैठक

**लोणंद :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,सातारा जिल्हा क्रीडा परिषद सातारा,सातारा जिल्हा क्रीडा कार्यालय व रयत शिक्षण संस्थेचे मालोजीराजे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज लोणंद यांचे संयुक्त विद्यमाने खंडाळा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा नियोजन बैठक सोमवार दि. २९ रोजी मालोजीराजे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज लोणंदच्या सभागृहामध्ये पार पडली.

या बैठकीसाठी सातारा जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी सन्माननीय नितीन तारळकर साहेब, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनील कोळी, नवनियुक्त सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी रवी पाटील, मालोजीराजे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य चंद्रकांत जाधव, उपप्राचार्य आबाजी धायगुडे, तालुका क्रीडा समन्वयक चंद्रकांत भोईटे उपस्थित होते. खंडाळा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतील १० क्रीडा प्रकारांचे वेळापत्रक यामध्ये नियोजित करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी नितिन तारळकर यांनी खेळाडूंच्या सोयी सुविधांसाठी विशेष प्रयत्न करावेत असे क्रीडा शिक्षकांना सांगितले. स्पर्धा कालावधीमध्ये क्रीडा शिक्षकांनी कोणकोणती काळजी घ्यावी व जबाबदाऱ्या कोणत्या आहेत याची जाणीव करून दिली. याप्रसंगी तालुक्यातील राज्य, राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंच्या क्रीडा शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. खंडाळा तालुक्यातील जवळपास ५१ क्रीडाशिक्षक या बैठकीसाठी उपस्थित होते.



# बेळगावी-मिरज विशेष पूर रेल्वे साताऱ्यापर्यंत वाढवा

**सातारा :** रेल्वे प्रवासी सल्लागार समिती सदस्यांची मागणी बेळगावी-मिरज विशेष पूर रेल्वे साताऱ्यापर्यंत वाढवासांगली:सांगलीव सातारा जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाल्याने रस्ते वाहतूक विस्कळीत झाली आहे. अशा स्थितीत बेळगावी तेमिरजया मार्गावर सुरु केलेल्या पूर विशेषरेल्वेचासातारा स्थानकापर्यंत विस्तार करावा, अशी मागणी विभागीयरेल्वेप्रवासी समिती समितीच्या सदस्या नम्रता तिवारी यांनी मध्य रेल्वेच्या पुणे विभागीय व्यवस्थापक इंदुराणी दुबे यांना याबाबत निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, सांगली, कराड, भिलवडी, ताकारी, किर्लोस्करवाडी, सातारा याठिकाणी मुसळधार पावसामुळे कृष्णा, वारणा, कोयना, पंचगंगा, येरळा या नद्या ओसंडून वाहत आहेत. सांगलीतील कृष्णा नदीची पाणीपातळी ३९ फूट तर मिरजेत ५० फूट आहे. सातारा, कराडपासून ५० कि.मी. अंतरावर असलेल्या कोयना धरणातून आणि सांगली जिल्ह्यातील चांदोली धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. सांगली सातारा जिल्ह्यातील बरेच पूल व रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

दक्षिण पश्चिम रेल्वेच्या हुबळी विभागाने १ ऑगस्ट ते ४ ऑगस्टदरम्यान पूरग्रस्तांच्या मदतीसाठी बेळगाव-मिरज विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

महाबळेश्वर आणि पाचगणी येथे गेलेले कर्नाटकातील पर्यटक मिरज जंक्शनपर्यंत १८० कि.मी. अंतरावर जाऊन ही विशेष गाडी पकडू शकत नाहीत. त्यासाठी सातारा ते बेळगावी थेट गाडी हवी. प्रत्येक वेळी सातारा, कराड, किर्लोस्करवाडी, भिलवडीच्या लोकांनी मिरजेत येऊनच कर्नाटक जाणारी रेल्वे पकडावी, असा आग्रह मध्य रेल्वे करते. त्यामुळे खूप गैरसोय होत आहे.

# वडूज येथे आज गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी सेवागौरव

**वडूज :** खटाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती प्रतिभा भराडे व विस्तार अधिकारी रेखा देशमुख या ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्ताने शिक्षण विभाग व खटाव तालुका प्राथमिक शिक्षक संघ, प्राथमिक शिक्षक समिती यांच्यावतीने गुरुवार दि. १ ऑगस्ट रोजी मधुमाला मंगल कार्यालय (सातेवाडी) येथे दुपारी १ वा. ३० वाजता सेवागौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्राथमिक शिक्षकांच्या विविध संघटनेचे तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय





पदाधिकारी व इतर क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी या कार्यक्रमास शिक्षणप्रेमी व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# महाराष्ट्राची परिस्थिती शरमेने मान खाली घालावी अशी

## महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेवर न बोललेलेच बरे

**कराड :** माजी गृहमंत्र्यांनी विद्यमान गृहमंत्र्यांवर केलेले गंभीर आरोप पाहता महाराष्ट्राची परिस्थिती शरमेने मान खाली घालावी अशी झाली आहे. महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेवर न बोललेलेच बरे असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केले. कराड येथे पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी इंद्रजीत चव्हाण, अल्पसंख्याक सेलचे झाकीर पठाण, कराड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मनोहर शिंदे, कराड शहर काँग्रेसचे अध्यक्ष ऋतुराज मोरे यांची उपस्थिती होती.

राज्यातल्या राजकारणावर बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, घोडेबाजार करणाऱ्या लोकांना, विश्वासघात करणाऱ्या लोकप्रतिनिधींना शिक्षा करायची का बक्षीस द्यायचे हे आता लोकांनाच ठरवावे लागेल. महाराष्ट्रातील सत्तांतर हे फक्त देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे नव्हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आशीर्वादाने झाले आहे. त्यामुळे नरेंद्र मोदींनी हा देश कुठे आणून ठेवला आहे? असा सवालही त्यांनी यावेळी केला.



आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस किती जागा लढणार? याबाबत छेडले असता पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, महाविकास आघाडीचे विधानसभेच्या जागांचे सूत्र ठरलेले आहे. किती जागा लढणार हे मी स्पष्ट सांगणार नाही मात्र तिन्ही पक्ष एकत्रित बसून यावर चर्चा करून निर्णय होईल हे मात्र नक्की.उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांनी वेशांतर करून मुंबई ते दिल्ली प्रवास करणे म्हणजेच देशातील विमानसेवा किती ढिसाळ आहे हे समोर येते. यातून राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

# अतिक्रमण हटाव हटविण्याबाबत उच्च न्यायालयात जाणार

## संजय पवार : साताऱ्यात हॉकर्स संघटनेचे बंद आंदोलन



**सातारा :** सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हातगाडीधारकांना चार दिवसात अतिक्रमण हटविण्याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारची कारवाई म्हणजे न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असून हातगाडीधारकांवर अन्याय देखील आहे. कारवाईबाबत फेरविचार न केल्यास याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती जिल्हा हॉकर्स संघटनेचे सातारा शहर अध्यक्ष संजय पवार यांनी दिली.

बांधकाम विभागाने बजावलेल्या नोटिसीच्या विरोधात तहसील कार्यालय परिसरात असणाऱ्या हातगाडी धारकांनी बुधवारी बंद पुकारला. या बंदमध्ये सर्वच हातगाडीधारक सहभागी झाले. यानंतर दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत संजय पवार यांनी संघटनेची भूमिका मांडली.

संजय पवार म्हणाले, सातारा शहरातील काही हातगाडीधारकांचा न्यायालयाच्या आदेशानुसार बायोमेट्रिक सर्वे करण्यात आलेला आहे. मात्र अनेक जण आजही या सर्वे पासून वंचित आहेत. या ज्यांचा सर्वे झाला नाही याचा अर्थ ते अनधिकृत आहेत असे म्हणता येणार नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाने हॉकर्स संघटनेला महाबळेश्वर-विटा मार्गावरील अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीस बजावली आहे. चार दिवसात ही अतिक्रमणे हटविण्याचे नोटिसीत नमूद केले आहे. हातगाडीधारकांवर जर सरसकट कारवाई झाली तर हातावर पोट असणाऱ्या या विक्रेत्यांनी करायचे काय? त्यांनी आपल्या उदरनिर्वाहाची गाडी कशी चालवायची? यासह अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यापूर्वी बांधकाम विभागाने उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे. शहरातील सर्व हॉकर्सचा बायोमेट्रिक सर्वे करून त्यांना ओळखपत्र द्यावे, हॉकर्स झोन निश्चित केल्याशिवाय त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करू नये, अशी मागणी यावेळी संजय पवार यांनी केली. आमच्या मागण्यांची दखल न घेतल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाईल, असेही ते म्हणाले.

यावेळी हॉकर्स संघटनेचे जिल्हाध्यक्ष सादिक पैलवान, जिल्हा सचिव शाम चिंचणे, दीपक शिंदे, सातारा शहर अध्यक्ष संजय पवार, कार्याध्यक्ष संदीप माने, विनोद मोरे, सागर भोगावकर यांच्यासह हात गाडी धारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेमक्या अतिक्रमणांचा पालिकेने दिला तक्रारदाराला गृहपाठ

**सातारा :** गोडोली येथील साईबाबा चौकात झालेल्या नेमक्या अतिक्रमणांची यादी द्या असा उलट गृहपाठ सातारा पालिकेने तक्रार दार अजय पार्टे यांना करायला लावला आहे .वर्दळीच्या रस्त्यापासून वीस फूटाचा सेटबॅक असणे आवश्यक असताना साईबाबा मंदिर परिसरातील टपऱ्या अपघाताचे निमित्त ठरू शकतात . ही अतिक्रमणे हटवण्याची इच्छाशक्ती दाखवण्यापेक्षा सातारा पालिका केवळ कागदी घोडे नाचवत असल्याची तक्रार होत आहे .गोडोलीकरांच्या गांधीगिरीलाही पालिका प्रशासनाने कात्रजचा घाट दाखवल्याची चर्चा आहे .

गोडोलीतील साईबाबा मंदिर चौकातील चारही रस्तावर हातगाडे, टपऱ्या, रस्त्यावर पार्किंग आणि अतिक्रमणाचा चहूबाजूंनी विळखा पडला आहे.यामुळे रोज या चौकात वाहतूक कोंडी आणि त्याचा सर्वांना नाहक त्रास होतो. या चौकातील वाहतूकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यासाठी बांधकाम विभाग पोलीस आणि नगरपालिकेकडे सामाजिक कार्यकर्ते अजय पार्टे यांनी निवेदन दिले. अतिक्रमणाबाबत स्वतःच्या कर्तृत्वात कसूर करणाऱ्या पालिकेच्या मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी सामाजिक कार्यकर्ताला सर्व्हे नंबर सह अतिक्रमण दर्शवून नकाशा सादर करण्याचा गृहपाठ दिला आहे.

सातारा शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यावर असलेल्या गोडोलीतील साईबाबा चौकात चार दिशांनी येणाऱ्या रस्त्यांवर मोठी वर्दळ असते. याच चौकात चहूबाजूंनी अनाधिकृत हातगाडे, टपऱ्या, रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्किंग आहे. यामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने दोन वाहतूक पोलीस आणि दोन वॉर्डन कर्मचारी असून ही तासनतास ट्रॅफिक जॅम होते. याची नगरपालिकेकडून कधीच दखल घेतली जात नाही.बांधकाम विभागाचे अधिकारी फिरकत नाहीत. म्हणून सामाजिक कार्यकर्ते अजय पार्टे आणि काही नागरिकांनी दि.५ जुलै रोजी वाहतूक कोंडीला अडथळा करणारे अनाधिकृत हातगाडे टपऱ्या रस्त्यावरील पार्किंग हटविण्याची मागणी बांधकाम विभाग, पोलीस आणि नगरपालिकेकडे निवेदन देऊन केली. मात्र याची दखल ही न घेतल्याने दि.१९ जुलै पासून या चौकात प्रबोधन फलक हातात घेऊन या चौकात गांधीगिरी मार्गाने अनेकांनी आंदोलन केले.

या गांधीगिरी आंदोलनाची चर्चा वाढल्याने तब्बल २५ दिवसांनी उपरती सुचलेल्या नगरपालिकेने सामाजिक कार्यकर्ते अजय पार्टे यांना नेमकी कोणती अतिक्रमणे काढणे अपेक्षित आहे. त्याची स्पष्ट माहिती त्यांच्या सर्व्हे नं. सहित द्यावी.तसेच रस्त्यावर झालेले अतिक्रमण नकाशावर दर्शवून हे पत्र मिळताच सदर बाबतीत सात दिवसांच्या आत पुरावे सादर करण्यात यावेत. तद्नंतर उचित कारवाई करणे योग्य होईल.असे पत्र मुख्याधिकाऱ्यांनी अजय पार्टे यांना दिले आहे.

## हडपसर शिवसेना मतदार संघाच्या वतीने लोकशाहिर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**हडपसर :** हडपसर मतदार संघ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.

शिवसेना हडपसर विधानसभा संघटक संजय सपकाळ यानी लोक शाहिर आण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विभाग प्रमुख दत्ता खवळे, शाखा प्रमुख अजय सकपाळ ,प्राध्यापक राजेंद्र शिखरे ,प्रा.राजेंद्र शिर्के, विस्वास राजगे , गणेश राजगे, अक्षय पोटे, नितिन देवकाते , कुणाल सपकाळ , गणेश जाधव ,अनुज सपकाळ , सुरेश दोरी, गणेश जाधव ,अनुज सपकाळ , सुरेश दोरी, परमेश्वर पंचम , संजय सुयवंशी , तानाजी घोलप, दुर्गाअप्पा कांबळे , अरुण पाटील , इ शिवसैनिक उपस्थित होते